# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

**दिनांक १८.०७.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीला अटक.**

दिनांक १८.०७.२०२६ चे १०.३० वा. ते १३.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, नंदनवन झोपडपट्टी, केडीके कॉलेज रोड, मनपा पब्लीक स्मार्ट टॉयलेटचे वरील मजल्यावर अंमली पदार्थ गांजा आनलेला आहे. अशा खात्रीशिर माहीती वरून नमुद ठिकाणी पंचासमक्ष गेले असता, तेथे एक ईसम पोलीसांना पाहुन पळण्याचे प्रयत्नात असतांना, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव निलेश अशोक डोरसे, वय २६ वर्षे, रा. नंदनवन झोपडपट्टी, गल्ली नं. १२, राजेंद्र नगर, मारोती मंदीर जवळ, नागपुर असे सांगीतले. त्याची तसेच, पब्लीक टॉयलेटचे वरचे मजल्यावरील रूमची झडती घेतली असता, त्यामध्ये प्लास्टीक बोरीमध्ये ब्राऊन रंगाचे टेपमध्ये गुंडाळलेले एकुण २४ पॅकेट मिळुन आले. त्याची पाहणी केली असता, त्यामध्ये अंमली पदार्थ हिरव्या रंगाचे पानेफुले असलेला, उग्रवास असलेला गांजा एकुण २४ किलो २१० ग्रॅम वजनाचा मिळुन आला. आरोपींचे ताब्यातुन गांजा, ०१ मोबाईल फोन असा एकुण ०६,१५,२५०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीची सखोल विचारपूस केली असता, त्याने त्याचे साथिदार पाहिजे आरोपी १) सुरज उर्फ सुर्यवंशी प्रकाश उईके, २) सुमित मनोज भलावे, ३) अक्षय सुर्यवंशी व ४) अक्षय नावाचा ईसम रा. ओडीसा यांचे मदतीने ओडीसा येथुन विक्री करीता आणल्याचे सांगीतले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगुन व साठवणुक करून समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क), २०(ब)(ii)(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे नंदनवन येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह नंदनवन पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, सपोनि. शिवाजी नन्नावरे, पोउपनि. नागेश पुन्नावाड, नापोअं. शेषराव राऊत, पोअं. अश्वीन मांगे, समीर शेख, कुणाल मसराम व चापोअं. कमलेश यांनी केली.



**२) पाचपावली पोलीसांची कामगीरी :— घरफोडी व चोरी करणारे अट्टल गुन्हेगारांविरूध्द मकोका अंतर्गत कारवाई.**

दिनांक १५.०६.२०२६ चे ०८.०० वा. ते दिनांक १८.०६.२०२६ चे ११.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत लष्करीबाग, लाईन क्र. ८, घसीयारीपुरा, नागपूर येथे राहणारे फिर्यादीचे भाऊ प्रकाश गुप्ता हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह खाटुशाम, राजस्थान येथे देवदर्शनाकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे भावाचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी आलमारीतील रोख १,५०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,८३,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. अशा फिर्यादी अनिल हिरालाल गुप्ता, वय ४९ वर्ष, रा. प्लॉट नं. ३४८, सवर्ण नगर, गुरुनानक फार्मसी कॉलेजचे बाजुला, कपीलनगर, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, पाचपावली पोलीसांनी तांत्रीक तपास करून व मिळालेल्या खात्रीशिर माहीतीवरून आरोपी १) अनुप उर्फ अंशुल देवाजी वाकडे, वय १९ वर्षे, रा. घशियारीपुरा, गल्ली नं. ८, गुप्ताचे घराजवळ, पाचपावली, नागपुर २) यश उर्फ बाबा संजय बन्सोड, वय २५ वर्षे, रा. लताबाईचे घराजवळ, इंदोरा, जरीपटका, नागपुर यांना ताब्यात घेवुन, विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हा संगणमताने केल्याची कबुली दिली. त्यांना गुन्ह्यात अटक करण्यात आली. गुन्ह्याचे तपासात आरोपींनी वरील व ईतर गुन्ह्यात चोरी केलेले सोन्या—चांदीचे दागिने व ईतर मुद्देमाल असा एकुण ५९,१२,५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. गुन्ह्यातील आरोपी क्र. १ हा टोळीप्रमुख असुन, आरोपी क्र. २ हा टोळीचा सदस्य आहे. आरोपी हे कोणताही समाजमान्य कामधंदा न करता, त्यांनी नागपुर शहरात अनेक ठिकाणी चोरी, घरफोडी, अश्लील शिवीगाळ करणे, मारहाण करणे, अवैद्य हत्यार बाळगणे असे मालमत्तेविरूध्द व शरीराविरूध्द अनेक गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. आरोपी हे अत्यंत निर्ढावलेले असुन, त्यांचे कृत्याने सामान्य नागरीकांचे मनात जिवीत व मालमत्तेविषयी असुरक्षिततेची भावना व भिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे आरोपींविरूध्द महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा. वरिष्ठांचे आदेशाने गुन्ह्यामध्ये कलम ३(१)(ii),३(२),३(४) महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा— १९९९ (मकोका) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे. आरोपी हे मध्यवर्ती कारागृहात असुन, गुन्ह्याचा पुढील तपास मा. सहायक पोलीस आयुक्त, लकडगंज विभाग करीत आहेत.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अनिरूध्द पुरी, पोनि. गुन्हे विवेक पडघन, पोउपनि. रणजीत माजगांवकर, पोअं. नितीन लोखंडे, देवेंद्र सहारे, मपोहवा. हर्षलता गजभिये, मपोअं. ममता बागडे व श्वेता गुलबासे यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे एमआयडीसी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १७.०७.२०२६ चे १९.३० वा. चे सुमारास आशिष देविलाल चौधरी, वय ३२ वर्षे, रा. संगम रोड, वानाडोंगरी, एमआयडीसी, नागपुर हे त्यांचे टिव्हीएस मोटारसायकल क्र. एम.एच. ३१ जिएच १४२१ ने पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, शालीनीताई मेघे हॉस्पीटल समोरून नागपुर कडे जाणाऱ्या रोडवरून जात असता, पांढऱ्या रंगाचा टाटा ट्रक क्र. एम.एच. १० ईक्यु ४५७२ चा चालक नामे सुजित तानाजी खांडेकर, वय ३७ वर्षे, रा. कुपवाड, कापसे प्लॉट, बाळकृष्ण कॉलोनी, मिरज, सांगली याने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन आशिष चे दुचाकीला धडक देवुन त्यांना गंभीर जखमी केले. जखमी यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी स्नेहल संतोष डोंगरे, वय २५ वर्षे, रा. वार्ड नं. १, अमर नगर, एमआयडीसी, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. पंकज सयाम ९४०५५४५४२७ यांनी ट्रक चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे अजनी</u> :—** दिनांक १७.०७.२०२६ चे ०१.०० वा. ते ०२.०० वा. चे दरम्यान, ईसम नामे शिवा विजय मैत्रेकर, वय २४ वर्षे, रा. सावित्रीबाई फुले नगर, मानेवाडा रोड, सिध्देश्वर सभागृहाजवळ, नागपुर हे आपले सिडी डिलक्स दुचाकी क्र. एम.एच. ३१ डिएफ ४१३३ ने पोलीस ठाणे अजनी हद्दीत तुकडोजी पुतळा जवळील, आशिष सावजी समोरून जात असतांना, अचानक त्यांचे दुचाकीवरील संतुलन बिघडल्याने, ते वाहनासह रस्त्याचे बाजुचे ईलेक्ट्रीक पोल ला धडकुन गंभीर जखमी झाले. जखमी यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले.

यात्प्रकरणी फिर्यादी अजय विजय मैत्रेकर, वय २० वर्षे, रा. सावित्रीबाई फुले नगर, मानेवाडा रोड, सिध्दश्वर सभागृहाजवळ, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे अजनी येथे सपोनि. सचिन निंबाळकर यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**